Gør alle tog-
stationer til-
gængelige
for handicap-
pede / 육교를
더 많이 만듭
시다 / Öffentli-
che Ver-
kehrszentren
in Kulturzent-
ren verwan-
deln / Give
tax credits for
riding a bicy-
cle / 每天早上有公社瑜伽 /
أن تجعل الخيارات السليمة
سهلة المنال / Pintar las ace-
ras de diferentes colores /

Et
des
loge-
ments
bon
marché
dans tous
les quartiers
/ चिकित्साभरे
बाग बगीचों की
रचना हो ताकि
तनाव को रोका
जा सके / Ite'ramo si-
se awon eto idanileko
siwaju si paapa julo ni
awon adugbo ti o ba si
ku die k'a a
to / Κοινωτική

Εκπαίδευση
για την διαχεί-
ρηση των
αποβλήτων /
Portare più lu-
ce naturale
nelle metro-
politana / יוצר
יותר מקומות צי
בוריים חדשניים
ורב תכליתיים
/ दर नवीन
बाधणी बरोबर
पाच झाडे लावणे
/ Meer publie-
ke ruimte voor
muziek en
kunst / 公共交

通機関と公共
交通機関をつ
なげるために、
自転車用車線
を設置する /
Dołóż więcej
starań do
zredukowa-
nia hałasu /
Установить
на крышах
садики или
солнечные
батареи, ко-
торые будут
пользовать-
ся общим
доступом /

ปลูกต้นไม้กั้น
ระหว่างทางเท้า
และถนน / Criar
uma versão virtu-
al do munici-
pio através
das redes
sociais / Làm
thùng hấp dẫn
để che giấu rác
/ هرهفته چیز تاه‌ای
به همسایه‌های
خود می‌آموزم
/ Büyük şe-
hirlerde kompakt
araba paylaşım
programları ge-
liştirerek /

**BMW GUGGENHEIM LAB**

**Advisory Committee**
Daniel Barenboim
Elizabeth Diller
Nicholas Humphrey
Muchadeyi Ashton Masunda
Enrique Peñalosa
Juliet Schor
Rirkrit Tiravanija
Geetam Tiwari
Wang Shi

**Media Alert**

# बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब मुंबईकडून सुरूवातीच्या कार्यक्रमांची सखोल माहिती आणि सॅटेलाइटच्या ठिकाणांची घोषणा

## पार्श्वभूमी

**९ डिसेंबर २०१२** पासून **२० जानेवारी २०१३** पर्यंत बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब मुंबई आणि डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम यांनी संयुक्तरित्या मुंबई शहरात विविध **मोफत** सार्वजनिक कार्यक्रम आणि प्रकल्पांचे आयोजन केले असून त्याची संकल्पना मी- वी ही आहे. व्यक्ती आणि समाज यांच्या हितातील समतोल साधण्यासाठी मी-वी कार्यक्रमाची रचना ही मुंबई आणि जगभरातील शहरांसाठी एक नवीन दृष्टिकोन प्रस्थापित करण्यासाठी करण्यात आली आहे.

मुंबई लॅब टीम यांनी आखलेले आणि स्थानिक कार्यक्रम सल्लागार तसेच गुगेनहाइम क्युरेटर्स यांनी विकसित केलेले लॅब प्रोग्राम्स यांच्या माध्यमातून सार्वजनिक ठिकाणे आणि वैयक्तिक आणि सामुदायिक गरजा या गोष्टी आणि २० दशलक्षांहून जास्त लोक राहत असलेल्या वर्दळीच्या शहरात आव्हाने आणि संधी यांच्याबाबत मुंबईकर काय निवड करतात हे यातून पाहिले जाणार आहे. हा कार्यक्रम भायखळ्याच्या डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियममध्ये सलग सहा आठवडे सादर केला जाणार असून याशिवाय अतिरिक्त उपक्रम संपूर्ण मुंबई शहरात निरनिराळ्या ठिकाणी आयोजित केले जाणार आहेत.

## निरनिराळी ठिकाणे

अनेक लोक आणि विविध ठिकाणे इथपर्यंत पोहोचण्यासाठी एका फिरत्या सॅटेलाइट लॅबच्या माध्यमातून सर्वसामान्य लोकांसाठी मोफत कार्यक्रमांचे आयोजन खालील पाच ठिकाणी केले जाणार आहे.

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

bmwguggenheimlab.org

- **हॉर्निमन सर्कल**: फोर्ट (१३-१७ डिसेंबर)
- **संभाजी पार्क**: मुलुंड पूर्व (२०-२४ डिसेंबर)
- **प्रियदर्शनी पार्क**: मलबार हिल (२७-३० डिसेंबर)
- **बाटलीबॉय कंपाऊंड**: मिल वर्कर कॉलनी (३-७ जानेवारी)
- **माहीम बीच**: एच/डब्ल्यू प्रभाग (१०-१३ जानेवारी)

<u>**मुंबईतील कार्यक्रम**</u>

या लॅबसाठीचे कार्यक्रम आणि उपक्रम सहा मालिकांमध्ये आयोजित केले जाणार आहेत- काही खूप व्यावसायिक आणि काही खूप मनोरंजक आहेत.

- **मीट इन दि मिडल**: यातून खासगी आणि सार्वजनिक भागीदारांना एकत्र आणले जाणार असून त्यात मूलभूत विचारवंतांपासून ते शहरातील अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांचा समावेश आहे. संवाद, चर्चासत्रे आणि साइटना भेटी यांच्यामाध्यमातून सहा संकल्पनांवर विचार केला जाऊन त्या जोडल्या जातील. वाहतूक, जागा, गृहनिर्माण, पर्यावरण, गुंतवणूक आणि नागरी नियोजन.
- **ब्रिजिंग**: या माध्यमातून एकाच क्षेत्रात रस असलेल्या लोकांना म्हणजे अगदी खेळापासून स्वयंपाकापर्यंत, व्यावसायिक तज्ज्ञांपासून ते सर्वसाधारण लोकांपर्यंत प्रोत्साहन देऊन आपले ज्ञान एकमेकांना देऊन एकमेकांशी चर्चा करण्यासाठी उत्तम कार्यशाळा आणि खेळ यांचा उपयोग केला जाणार आहे.
- **सिटी ड्रीम्स**: डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम यांनी सादर केलेले आणि म्युझियममध्ये तसेच सॅटेलाइट ठिकाणी असलेल्या या उपक्रमांच्या माध्यमातून मुंबईच्या सांस्कृतिक वारशाचा ऐतिहासिक विकास या विषयावर संवादात्मक कार्यक्रम आणि मुंबईतील तरूण आणि भविष्यातील नागरी परिसर यांचे प्रतिबिंब त्यात पडणार आहे.
- **चित्रपटांचे प्रदर्शन**: यांच्या माध्यमातून समकालीन आणि जुने बॉलीवूड चित्रपट, लघुपट, ॲनिमेशन आणि प्रयोगात्मक उपक्रम जे एका शहरी वातावरणात वैयक्तिक जागाच्या शोधांबाबत चर्चा करण्यात येणार आहेत.
- **विचारांसाठी खाद्य**: मुंबईतील टेबल्स आणि रस्ते यांच्यावरील अन्न आणि पेयांच्या माध्यमातून दिसाऱ्या संस्कृतीवरील चर्चा म्हणून त्याचा वापर केला जाणार आहे. त्यातून पोषण, अन्न उत्पादन, अन्नसुरक्षा आणि सुरक्षितता यांच्यामधील स्थानिक आणि जागतिक प्रश्नांवर लक्ष वेधले जाणार आहे.
- **मुंबई उलगडणे**: यातून उच्च ऊर्जा, चर्चात्मक विविधांगी कार्यक्रम आणि पार्टी सत्रे ज्यातून मुंबईकर आपल्या आजूबाजूच्या परिसराशी जुळवून घेतात आणि त्यात चर्चा,

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

संगीत, नाट्य, कथाकथन आणि शहराच्या विविधांगी दृष्टिकोनाचा विकास केला जाणार आहेत.

**प्रकल्प**

या लॅबने विविध प्रकारच्या सहभागात्मक संशोधन अभ्यास आणि शहराच्या डिझाइनचे प्रकल्प आखले असून ते संपूर्ण मुंबई शहरात चालवले जाणार आहेत. त्यातून भविष्यातील शहरातील आणि इतर ठिकाणच्या नागरी डिझाइन्स दाखवल्या जाणार आहेत. यात इतर अनेक कार्यक्रमांप्रमाणेच खालील कार्यक्रमांची घोषणा केली जाणार आहे:

- **तुमचे ठिकाण, माझे ठिकाण किंवा आपली सार्वजनिक जागा? मुंबईतील प्रायव्हसी आणि जागा (संशोधन प्रकल्प)** या प्रकल्पाच्या माध्यमातून समाज प्रायव्हसी कशी जपतो या विषयावर मुंबईकरांना योगदान देण्यास आवाहन केले जाणार आहे. हा अभ्यास २०१२च्या उन्हाळ्यात सुरु झाला आणि पार्टनर्स फॉर अर्बन नॉलेज, ॲक्शन ॲण्ड रिसर्च (पुकार) या एका स्वतंत्र मुंबई संशोधन संस्थेमार्फत चालवला जाणार आहे.
- **तुमचे ठिकाण, माझे ठिकाण किंवा आपली सार्वजनिक ठिकाम? मुंबईतील प्रायव्हसी आणि जागा, एक दृश्य सर्वेक्षण (संशोधन प्रकल्प)** या माध्यमातून सहभागात्मक मॅपिंग आणि फोटोग्राफी टूर्स याद्वारे मुंबईकर वैयक्तिक जागा शोधतात किंवा निर्माण करतात. हा प्रकल्प कमला रहेजा विद्यानिधी इन्स्टिट्यूट फॉर आर्किटेक्चर ॲण्ड एन्व्हायर्नमेंट स्टडीज (केआरव्हीआयए) येथील डिझाइन विभागाच्या सहकार्याने राबवला जाणार आहे.
- **कला नगर ट्रॅफिक जंक्शन स्पर्धा (डिझाइन प्रकल्प)**: या प्रकल्पाचे आयोजन मुंबई एन्व्हायर्नमेंटल सोशल नेटवर्क (एमईएसएन) यांच्या सहकार्याने केले जाणार असून लॉर्ड कल्चरल रिसोर्सेस यांच्याकडून त्यांचे प्रशासन केले जाणार आहे. या प्रकल्पाद्वारे विद्यार्थी आणि व्यावसायिकांना शहरातील सर्वाधिक व्यग्र अशा वाहतूक केंद्रांची नव्याने कल्पना करण्यास सांगितले जाणार आहे.
- **लॅन्ड लिंक (डिझाइन प्रकल्प)** या प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबईतील सध्याचे पाणीपुरवठ्याच्या यंत्रणेचा विचार एक नवीन ऑटोरिक्षा हायवे आणि पादचारी पूल म्हणून मुंबईतील विविध ठिकाणी कसा करता येईल, याचे मार्ग शोधले जाणार असून त्यात सार्वजनिक हिताच्या प्रकल्पांचा विचार केला जाईल.
- **मुंबई स्टॅक्ड सिटी (संशोधन प्रकल्प)** यातून स्टॅक्ड पॉप्युलेशन इंडेक्स (एसपीआय) ची ओळख करून दिली जाणार असून त्यातून मुंबईतील लोकसंख्येच्या घनतेचे अचूक चित्रण केले जाणार आहे. विशेषत: जेथे ते घडते आणि जगण्याच्या परिस्थितीवर ते कसे प्रतिबिंबित होते तेही दाखवले जाणार आहे.

**Solomon R.
Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

- **ट्रान्सफॉर्मर्स:** यांच्या माध्यमातून लोकांना डॉ. भाऊ दाजी लाड वस्तुसंग्रहालयातील प्रयोगशाळेतील ठिकाणी दर आठवड्याला प्रयोग करण्याची संधी दिली जाणार असून त्यात पारंपरिक आणि आधुनिक भारतीय कला आणि हस्तकला यांचा समावेश करता येईल.
- **टेस्टिंग, टेस्टिंग! मुंबई (संशोधन प्रकल्प):** वॉटर्लू विद्यापीठ यांनी विकसित केलेली सहलींची मालिका आणि न्यूयॉर्क आणि बर्लिन लॅब्समध्ये आयोजित कार्यक्रमांमुळे दिसून आलेले लॅबजवळील शहरी ठिकाणांचे मानसिक परिणाम आपल्या डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियमच्या ठिकाणी पाहता येतील.

**मुंबई कार्यक्रमांचा संघ**

आएशा दासगुप्ता, नेव्हिली मार्स, तृप्ती अमृतवार वैतला आणि हेक्टर झामोरा या मुंबई लॅब संघाशिवाय बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब मुंबईद्वारे कार्यक्रम सल्लागार पूजा वॉरियर, आरोन परेरा, नरेश फर्नांडिस, सौरव बिस्वास, सुरभी शर्मा, स्वाती संघवी, विक्रम डॉक्टर आणि अमर माहीमवाला यांचा समावेश असेल. मुंबई लॅबची स्थापना डेव्हिड व्हॅन डेर लीर आणि स्टेफनी वाई यांनी केली आहे.

**मुंबई प्रसारमाध्यमांसाठी कार्यक्रम**

बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब, मुंबई यांनी डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयाच्या सहकार्याने तुम्हाला प्रकल्प चमूला भेटण्यासाठी तसेच लॅबचा अनुभव ती सुरू होण्यापूर्वी घेण्यासाठी आमंत्रित केले आहे. कृपया तारीख लक्षात ठेवा आणि या तारखेच्या दरम्यान एक निमंत्रणपत्रिका येईल, तिच्याकडे लक्ष ठेवा. दिनांक: ६ डिसेंबर

**बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबबाबत:**

सोलोमन आर. गुगेनहाइम फाऊंडेशन आणि बीएमडब्ल्यू ग्रुप यांचा बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब हा एक संयुक्त विद्यम आहे. बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅबची स्थापना डेव्हिड व्हॅन डेर लीर आणि मारिया निकोनोर या सोलोमन आर गुगेनहाइम म्युझियमच्या सदस्यांनी केली आहे. शहरी विचारकेंद्राचा एक भाग आणि एक कम्युनिटी सेंटरचा भाग तसेच लोकांना जमा होण्यासाठी सार्वजनिक ठिकाण असलेले बीएमडब्ल्यू गुगेनहाइम लॅब हा एक जागतिक उपक्रम आहे. त्याचे उद्दिष्ट हे महत्त्वाच्या नागरी आव्हानांचा विचार करणे आणि जगभरातील शहरांमध्ये संवादयंत्रणा उभारणे आहे. लॅब साइट्समधील कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याबरोबरच लोकांना (@BMWGuggLab and #BGLab), Facebook, YouTube, Flickr, Foursquare, तसेच subscribe येथे जाऊन लॅबच्या न्यूजलेटरमध्ये अद्ययावत प्रकल्प पाहता येतील.

**सोलोमन आर गुगेनहाइम फाऊंडेशन बाबत**

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

१९३७ साली स्थापना झालेल्या सोलोमन आर. गुगेनहाइम फाऊंडेशनचे काम कला, विशेषत: आधुनिक आणि समकालीन काळ, हे सर्व प्रदर्शने, शैक्षणिक कार्यक्रम, संशोधन उपक्रम आणि प्रकाशने यांच्या माध्यमातून यांचा विचार करण्याचे आहे. १९७० साली सुरू झालेल्या न्यूयॉर्कमधील सोलोमन आर गुगेनहाइम म्युझियमच्या साखळीत पेगी गुगेनहाइम कलेक्शन व्हेनिस याचा विस्तार होऊन गुगेनहाइम म्युझियम बिलबाव (१९९७ साली सुरू झालेले) आणि बर्लिनमधील डॉइश गुगेनहाइम (१९९७-२०१३) आणि गुगेनहाइम अबुधाबीचे सध्या काम सुरू आहे. भविष्याचा विचार करत असताना गुगेनहाइम फाऊंडेशनने आंतरराष्ट्रीय करार केले असून त्यातून समकालीन कला, वास्तुरचना आणि डिझाइन या गोष्टी म्युझियमच्या भिंतींबाहेर नेण्याचा प्रयत्न केला आहे. फाऊंडेशनबाबतची अधिक माहिती येथे सापडू शकेल guggenheim.org.

**बीएमडब्ल्यूच्या सांस्कृतिक कटिबद्धतेबाबत**

आता गेल्या ४० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून बीएमडब्ल्यू ग्रुपने १००हूनही जास्त सांस्कृतिक सहकार्य करारांसाठी पुढाकार घेतला असून जगभरात असे करार केले आहेत. या कंपनीचे मुख्य उद्दिष्ट आधुनिक आणि समकालीन कला, जॅझ आणि शास्त्रीय संगीत यांच्याबाबत दीर्घकालीन कटिबद्धता दर्शवली आहे. डो जोन्स सस्टेनिबिलिटी इंडेक्सेसमध्ये गेल्या आठ वर्षांपासून बीएमडब्ल्यू ग्रुप हा उद्योगातील नेता म्हणून पुढे आला आहे. १९७२ साली तीन मोठ्या प्रमाणावरील चित्रे कलाकार जेरार्ड रिश्टर यांनी तयार केली असून ती बीएमडब्ल्यूच्या म्युनिक मुख्यालयात प्रदर्शनात मांडली गेली. तेव्हापासून ॲन्डी वारहोल, रॉय लिश्टेनस्टेन, ओलाफर एलिसन, जेफ कून्स, झुबेन मेथा, डॅनियल बॅरेनबोइम आणि ॲना नेट्रेको यांनी बीएमडब्ल्यूशी करार केले आहेत. या कंपनीने कार्ल श्वानझर, झाहा हदीद आणि कूप हिम्मेबऊ अशा प्रसिद्ध वास्तुरचनाकारांना महत्त्वाच्या कॉर्पोरेट इमारती आणि कंपन्यांचे डिझाइन करण्यासाठी नेमले होते. बीएमडब्ल्यू ग्रुपकडून आपण सहभागी असलेल्या सर्व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये कलात्मक स्वातंत्र्य घेतले आहे. एका यशस्वी व्यवसायासाठी नावीन्यपूर्ण घटकांसाठी कलात्मक कामासाठी महत्त्वाचे ठिकाण म्हणून बीएमडब्ल्यूकडे पाहिले जाते. अधिक माहितीसाठी पहा-
bmwgroup.com/culture and bmwgroup.com/culture/overview.

**डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम बाबत**

डॉ. भाऊ दाजी लाड म्युझियम हे मुंबईतील सर्वात जुने वस्तुसंग्रहालय आहे. त्याची स्थापना १८७२ साली झाली होती. तेव्हा त्याचे नाव व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट म्युझियम, मुंबई असे होते. मुंबई शहराचा इतिहास सांस्कृतिक विकास हे या प्रदर्शनातून दाखवण्यात आले आहे. सुंदर आणि कलात्मक कलेचा वारसा या म्युझियममधील कलेक्शनमधून दाखवण्यात आला असून आधुनिक कला आणि कारागिरीचे ते दर्शन आहे. या वस्तुसंग्रहालयाच्या पुनर्बांधणीच्या प्रकल्पाला जमनालाल

**Solomon R.**
**Guggenheim Foundation**
345 Hudson Street, 12th floor
New York, NY 10014
Phone +1 212 423 3500

बजाज फाऊंडेशनला पाठबळ दिलेले आहे आणि ते इंटेकने पूर्ण केलेले आहे. त्याला युनेस्कोचा एक्सलंस फॉर कल्चरल हेरिटेज कन्झर्वेशनचा २००५चा पुरस्कार देण्यात आला आहे. या म्युझियमच्या माध्यमातून एक विस्तारित प्रदर्शन कार्यक्रम सुरू केला असून त्यातून मोठे भारतीय कलाकार आणि आंतरराष्ट्रीय संस्था यांना एकत्र आणून मुंबईतील सार्वजनिक ठिकाणांवर समकालीन कलेचे प्रदर्शन घडवण्यात येणार आहे. समकालीन शहरी प्रश्नांवर चर्चा घडवून आणण्यासाठी सार्वजनिक व्यासपीठ निर्माण करण्यासाठी या प्रदर्शनांचा उपयोग केला जाणार आहे.

संपूर्ण प्रेस मटेरियलसाठी बघा bmwguggenheimlab.org/presskits
पब्लिसिटी चित्रांसाठी पाहा bmwguggenheimlab.org/pressimages
पब्लिसिटी व्हिडिओंसाठी पाहा bmwguggenheimlab.org/pressvideos
यूजर आयडी - photoservice पासवर्ड - presspass

**संपर्क**

**मुंबई:**

किशोर तिजोरे, रुदर फिन इंडिया
+ 91 9920303831 / tijorek@ruderfinnasia.com
अंजू वर्गिसिया, रुदर फिन इंडिया
+ 91 9739113676 / verghesea@RuderFinnAsia.com

**आंतरराष्ट्रीय:**

कॅट लायडेकर, पोल्स्कीन आर्टस् अॅन्ड कम्युनिकेशन्स काऊंसेलर्स
+ 1 212 715 1602 / lydeckerk@finnpartners.com

अभय डांगे, प्रेस अॅन्ड कॉर्पोरेट अफेयर्स, बीएमडब्ल्यू इंडिया
+ 91 124 4566 656 / Abhay.Dange@bmw.in

२८ नोव्हेंबर २०१२
#12XX/BGL24